# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०११०१

## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/२७२ /२०२३-२४

दि. ०४ / ०८/२०२३

## // दरपत्रक जाहिर सुचना //

**विषय :- जाहिरात विभागातील विविध जाहिरात माध्यमांवर जाहिरात प्रसिध्द करणेकामी QR Code कार्यान्वीत करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध जाहिरात माध्यमांवर जाहिरात प्रसिध्द करणेकामी महानगरपालिकेची परवानगी देण्यांत येत असते. सदर परवानगी कामी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार विविध जाहिरात माध्यमांवर QR CODE विकसीत करून कार्यान्वीत करणेकरीता योग्यता प्राप्त कंपनीकडून दि.०७/०८/२०२३ ते दि.१७/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत मोहरबंद दरपत्रक मागविणेत येत आहे. दरपत्रकाचा नमुना महानगरपालिकेत रक्कम रु.५९०/- रोखीने भरल्यानंतर जाहिरात विभागात उपलब्ध होऊ शकेल.

दि. ०७/०८/२०२३ ते दि.१७/०८/२०२३ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत जाहिरात विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, शुभम आर्केड, पहिला मजला, डी-मार्ट समोर, मिरा-हॉस्पिटल जवळ, भाईंदर (प), जि.ठाणे येथे सिलबंद दरपत्रकाचा लिफाफा सादर करावा. सदर दरपत्रकाचा नमुना दि.१८/०८/२०२३ रोजी सायं ४.०० वाजता उप-आयुक्त (जाहिरात) यांचे दालनात प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येईल. याबाबतची माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने)

**टिप :-**
कोणतेही एक दरपत्रक स्विकारण्याचा अथवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे. तसेच कोणतेही कारण न देता दरपत्रक जाहिर सुचना रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

Scanned by CamScanner